आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता

२६ डिसेंबर २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते यंदाचे प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान

- प्रधानमंत्र्यांच्या हस्ते सुपोषित ग्राम योजनेचा प्रारंभ

- वीर बाल दिनानिमित्त शहीद साहिबजादे यांना देशाची आदरांजली

- बॉर्डर गावसकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या चौथ्या सामन्यात यजमान ऑस्ट्रेलियाचा नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय/ दिवसअखेर  ६ बाद ३११ धावा

**आणि**

- ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मल्याळी लेखक एम टी वासुदेवन नायर यांचं निधन

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी आज १७ मुलांना नवी दिल्लीत प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान केले. एकूण सात श्रेणींमधे अद्वितीय कामगिरीसाठी हे पुरस्कार देण्यात आले आहेत. कला, संस्कृती, साहस, संशोधन, विज्ञान आणि तंत्रज्ञान समाजसेवा, क्रीडा आणि पर्यावरण क्षेत्रात केलेल्या कामगिरीबद्दल हे पुरस्कार देण्यात आलेले असून प्रत्येक पुरस्कार विजेत्या मुलांना पदक, प्रमाणपत्र आणि मानपत्र प्रदान करण्यात आले. शिखांचे दहावे धर्मगुरु गुरु गोविंदसिंग यांचे दोन पुत्र साहेबजादे बाबा जोरावरसिंह आणि बाबा फतेहसिंग यांच्या बलिदानाचं स्मरण म्हणून या दिवशी वीर बालकांना पुरस्कार प्रदान करण्यात येतात. यावेळी राष्ट्रपतींनी साहेबजादे यांना आदरांजली वाहिली. तसंच पुरस्कार मिळवणाऱ्या मुलांचे कौतुक केलं. बालवीर पुरस्कार विजेत्यांमध्ये महाराष्ट्रातल्या अमरावती जिल्ह्यातल्या १७ वर्षांच्या करिना थापा या मुलीचाही समावेश आहे. साहस आणि

वीरता क्षेत्रात तिला हा पुरस्कार देण्यात आला असून तिनं अतुलनीय प्रसंगावधान दाखवत आगीतून गॅस सिलेंडर बाहेर काढून तब्बल ३६ जणांचे प्राण वाचवले होते. राष्ट्रपती मुर्मु यावेळी म्हणाल्या....

**होल्ड बाईट...**

**<><><><><>**

वीर बालदिवस हा देशातल्या नागरिकांसाठी राष्ट्रीय प्रेरणा दिवस असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित वीर बाल दिवस कार्यक्रमात ते बोलत होते. सुपोषित ग्राम योजनेचा प्रारंभ त्यांनी यावेळी केला.

आजच्या या सोहळ्यात सांगली शिक्षण संस्थेच्या पथकानं महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व करत लेझीम कलाप्रकाराचं प्रात्याक्षिक सादर केलं. संस्थेतल्या १८ विद्यार्थिनी सह ४ वादक, १ व्यवस्थापक आणि १ संघ प्रमुख असा २४ जणांच्या संघाने हे प्रात्यक्षिक यशस्वी केलं.

वीर बालपुरस्कार विजेत्या मुलांशी या कार्यक्रमापूर्वी प्रधानमंत्र्यांनी संवाद साधला. तसंच नंतर झालेल्या संचलनाला हिरवा झेंडा दाखवला. आणि मानवंदना स्वीकारली. विविध राज्यांच्या पारंपारिक समृद्धीचं दर्शन घडवणाऱ्या वेशभूषा केलेल्या मुंलांची पथकं आणि चित्ररथ या संचलनात सहभागी झाले होते.

वीर बाल दिनानिमित्त देशभरांत विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. MyGov आणि MyBharat पोर्टलद्वारे ऑनलाइन प्रश्नमंजुषा तसंच इतर स्पर्धांची मालिका आयोजित करण्यात येणार आहे. शाळा, बाल संगोपन संस्था आणि अंगणवाडी केंद्रांमध्ये कथाकथन, निबंधस्पर्धा आदी अनेक उपक्रम राबवले जाणार आहेत.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज शिखांचे दहावे गुरु गुरु गोविंदसिंग यांच्या दोन लहान मुलांच्या साहेबजादे बाबा जोरावरसिंह आणि बाबा फतेहसिंग यांच्या स्मृतीला अभिवादन केलं. आपल्या समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की, लहान वयातही ते आपल्या तत्वाशी आणि आस्थेबरोबर एकनिष्ठ राहिले. त्यांचं बलिदान निष्ठा आणि वीरतेचं प्रतीक आहे.

या बाल वीरांच्या स्मृतीला देशात सर्वत्र अभिवादन करण्यात येत आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी साहेबजादे यांच्या प्रतिमेला फुलं अर्पण करून अभिवादन केलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या २७ डिसेंबरला स्वामित्व योजनेचा प्रारंभ होत आहे. देशातल्या सर्व जिल्ह्यांत डिजिटल पद्धतीनं जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ऑनलाईन माध्यमातून हा कार्यक्रम होईल. भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर इथं ही माहिती दिली. पन्नास लाखांहून अधिक मालमत्ता कार्डांचं वितरण या कार्यक्रमात केलं जाणार आहे.

<><><><><>

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या बॉर्डर गावसकर कसोटी क्रिकेट मालिकेतला चौथा सामना आज मेलबर्न इथे सुरू झाला. यजमान ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाकडून सॅम कोन्टास, उस्मान ख्वाजा आणि मार्क्स लाबुशेन यांनी अर्धशतकी खेळी केली. पाच सामन्यांच्या मालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येक एकेक सामना जिंकला आहे. आजच्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या ६ बाद ३११ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते प्रसिद्ध मल्याळी लेखक एम टी वासुदेवन नायर यांचं काल रात्री केरळमध्ये कोझिकोड इथं निधन झालं. त्यांच्या पार्थिवावर आज संध्याकाळी कोझिकोड इथल्या मावूर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत. केरळ सरकारनं त्यांच्या निधनानंतर राज्यातआज आणि उद्या दोन दिवसांचा दुखवटा जाहीर केला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी एम टी वासुदेव नायर यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. त्यांच्या निधनानं साहित्यविश्वाचं मोठं नुकसान झाल्याचं राष्ट्रपतींनी म्हटलं आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी नायर यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं असून भारताच्या साहित्य आणि चित्रपट विश्वात नायर यांच्या लेखनाचं मोठ योगदान असल्याचं म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देखील नायर यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. नायर यांच्या लेखनात मानवी भावनांचे सशक्त चित्रण असून त्यांचं कार्य अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील असं त्यानी म्हटलं आहे.

केरळचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान, केरळचे मुख्यमंत्री पिनारायी विजयन यांनी यांनी एमटी वासुदेवन नायर यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला.

**<><><><><>**

राष्ट्रीय आयुष अभियानामुळे देशवासियांना पारंपरिक पद्धतीवर आधारित आरोग्य सेवा आणि वैद्यकीय उपचार वाजवी दरात उपलब्ध झाले असल्याचं केंद्रीय आयुष राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी म्हटलं आहे. राष्ट्रीय आयुष मिशन अंतर्गत समग्र स्वास्थ्य सेवा या चित्रपट मालिकेचं जाधव यांनी काल दिल्लीत अनावरण केलं, त्यावेळी ते बोलत होते. ही मालिका राष्ट्रीय आयुष मिशनची उल्लेखनीय प्रगती आणि परिवर्तनकारी परिणामांवर प्रकाश टाकते, आजारांना प्रतिबंध करून, निरोगी जीवनाला चालना देण्यात आयुष मंत्रालयाची भूमिका यातून विशद होत असल्याचं, जाधव यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जगत प्रकाश नड्डा यांच्या निवासस्थानी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या NDA नेत्यांची काल नवी दिल्लीत बैठक झाली. आघाडीतील भागीदारांमध्ये समन्वय भक्कम करण्याचा या बैठकीचा उद्देश होता.भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, जनता दल (संयुक्त) नेते आणि केंद्रीय पंचायत राज मंत्री राजीव रंजन सिंह, जनता दल (धर्मनिरपेक्ष) नेते आणि केंद्रीय अवजड उद्योग मंत्री एच. डी. कुमारस्वामी, अपना दल पक्षाच्या अध्यक्ष केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री अनुप्रिया पटेल, तसंच केंद्रीय एमएसएमई मंत्री जीतन राम मांझी या बैठकीला उपस्थित होते. तेलुगू देसम पक्षाचे अध्यक्ष आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू,शिवसेना नेते एकनाथ शिंदे आणि राष्ट्रीय लोक मोर्चाचे अध्यक्ष उपेंद्र कुशवाह यांनीही या बैठकीला हजेरी लावली.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड उद्या जम्मू काश्मीरच्या दौऱ्यावर जाणार आहेत. श्री माता वैष्णोदेवी विद्यापीठाच्या दहाव्या दीक्षांत समारंभाला ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. तसंच ते माता वैष्णोदेवी आणि भेरोबाबा मंदिरात जाऊन दर्शनही घेणार आहेत.

**<><><><><>**

देश आज शहीद उधमसिंग यांची १२५ वी जयंतीनिमित्त त्यांच स्मरण करत आहे. शहीद उधमसिंग यांनी स्वातंत्र्यलढ्यात जालियानवाला बाग हत्याकांड घडवणाऱ्या जनरल ओडवायरची हत्या केली होती. देशातल्या तीन प्रमुख धर्मांमधली एकता दाखवण्यासाठी त्यांनी ब्रिटीशांच्या कोठडीत असताना राम मोहम्मद सिंग आझाद हे नाव धारण केलं होतं.

**//<><><><><>//**